शनिवार दि. १८ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## टेंभुर्णी - कुंभारझरी रस्त्याची दयनीय अवस्था; अपघात झाल्यावरच जाग येणार का?

### मोठ मोठे खड्डे, अरुंद व उखडलेला रस्ता; सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

### कायमस्वरूपी दुरुस्तीची ग्रामस्थांची जोरदार मागणी

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

टेंभुर्णीकुंभारझरी परिसराला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा संपर्क रस्ता सध्या पूर्णपणे दयनीय अवस्थेत असून, या मार्गावरून प्रवास करणे नागरिकांसाठी अक्षरशः जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे. ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबरी रस्ता, अरुंद मार्ग आणि पावसाच्या पाण्याने भरलेले खड्डे यामुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दिवसेंदिवस रस्त्याची अवस्था अधिकच बिकट होत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

हा रस्ता टेंभुर्णी, कुंभारझरीसह परिसरातील अनेक गावांसाठी प्रमुख संपर्क मार्ग आहे. दररोज या मार्गावरून शेतकरी शेतमाल घेऊन बाजारात जातात, विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवास करतात, कामगार नोकरीसाठी ये-जा करतात, तसेच रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवा देखील याच रस्त्याचा वापर करतात. मात्र खराब



रस्त्यामुळे प्रत्येक प्रवास धोकादायक ठरत आहे.

पावसामुळे खड्डे अधिक धोकादायक

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज वाहनचालकांना येत नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी हा मार्ग अधिक धोकादायक बनतो. अनेक दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात झाल्याच्या घटना घडल्याचे स्थानिकांनी सांगितले. काही वाहनांचे मोठे आर्थिक नुकसानही झाले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्याबाबत अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी आणि तोंडी तक्रारी करण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्षी पावसाळ्यापूर्वी किंवा नंतर केवळ तात्पुरती मलमपट्टी केली जाते. मात्र काही दिवसांतच डांबर निघून पुन्हा खड्डे पडतात. त्यामुळे शासनाचा निधी खर्च होऊनही नागरिकांना दर्जेदार रस्ता मिळत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

अरुंद रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला

रस्त्याची रुंदी कमी असल्यामुळे समोरासमोर दोन मोठी वाहने आली तर एक वाहन रस्त्याच्या कडेला घ्यावे लागते. रस्त्याच्या कडेला खड्डे आणि चिखल असल्याने वाहन घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. अनेक वेळा मोठी वाहने, ट्रॅक्टर, शालेय बस आणि दुचाकी यांच्यात जीवघेणे प्रसंग निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

ग्रामस्थांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रश्न उपस्थित केला आहे की, रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी मंजूर होत असतानाही प्रत्यक्षात दर्जेदार काम का होत नाही? सार्वजनिक बांधकाम विभाग नेमका कोणत्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे? अनेक वर्षांपासून हा प्रश्न कायम असून, संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.

टेंभुर्णीकुंभारझरी मार्गाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून अरुंद रस्त्याचे रुंदीकरण, दर्जेदार डांबरीकरण आणि कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या, टेंभुर्णीकुंभारझरी रस्त्याची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी., संपूर्ण रस्त्याचे दर्जेदार व कायमस्वरूपी डांबरीकरण करण्यात यावे., अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी., निकृष्ट काम करणाऱ्या संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी *(पान २ वर)*

## जालना पोलिसांचा 'तक्रार निवारण दिन' उद्या; नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींचे होणार जागेवरच निवारण

### १८ जुलै रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत विशेष उपक्रम; वरिष्ठ पोलीस अधिकारी विविध ठाण्यांना देणार भेटी

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी, अर्ज आणि विविध पोलीस विषयक समस्यांचे तातडीने निवारण करण्यासाठी जालना पोलिसांनी शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी 'तक्रार निवारण दिन' आयोजित केला आहे. सकाळी १०.३० ते दुपारी १.०० या वेळेत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून, नागरिकांना त्यांच्या प्रलंबित तक्रारी थेट संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी मिळणार आहे.

पोलीस प्रशासनाने हा उपक्रम 'आपल्या समस्या, आमची जबाबदारी' या संकल्पनेतून राबविला असून, नागरिकांना जलद, पारदर्शक आणि परिणामकारक न्याय मिळावा, हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

प्रलंबित अर्ज आणि तक्रारींवर होणार विशेष सुनावणी

तक्रार निवारण दिनादरम्यान प्रत्येक पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी त्यांच्या हद्दीतील प्रलंबित अर्ज, तक्रारी आणि नागरिकांच्या विविध समस्यांची प्रत्यक्ष नोंद घेणार आहेत. संबंधित प्रकरणांचा आढावा घेऊन शक्य तितक्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या प्रकरणांमध्ये अधिक तपास किंवा वरिष्ठ स्तरावरील निर्णय आवश्यक असेल, त्याबाबतही तातडीने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारीही घेणार तक्रारींचा आढावा

या विशेष मोहिमेत केवळ पोलीस ठाणे स्तरावरच नव्हे, तर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी () देखील उपस्थित राहून प्रलंबित अर्ज आणि तक्रारींचा आढावा घेणार आहेत. नागरिकांना थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आपली बाजू मांडण्याची संधी उपलब्ध होणार असल्याने अनेक प्रकरणांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वरिष्ठ अधिकारी करणार पोलीस ठाण्यांना भेटी

तक्रार निवारण दिनादरम्यान जिल्हा पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी विविध पोलीस ठाण्यांना भेटी देऊन तक्रार निवारण प्रक्रियेची पाहणी करणार आहेत.

यामध्ये खालील अधिकारी संबंधित उपविभागांत भेटी देणार आहेत

पोलीस अधीक्षक अंबड उपविभाग

अपर पोलीस अधीक्षक मोजपुरी परिसर

उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना चंदनझिरा पोलीस ठाणे

उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड घनसावंगी पोलीस ठाणे

उपविभागीय पोलीस अधिकारी, परतूर मंठा पोलीस ठाणे


उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकरदन हसनाबाद पोलीस ठाणे

या भेटीदरम्यान तक्रार निवारण प्रक्रियेचा आढावा घेऊन नागरिकांच्या अडचणींबाबत *(पान २ वर)*

## जालन्यातील आदित्य गावंडेला नीट परीक्षेत ९८.७८ पर्सेंटाइल

**जालना -प्रतिनीधी**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश (नीट) परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत जालन्यातील आदित्य विलास गावंडे या विद्यार्थ्याने ५६९ गुणांसह ९८.७८ पर्सेंटाइल मिळवत ऐतहासिक यश संपादन केले आहे.पैठण येथील नगर परिषद कार्यालयात स्वच्छ्ता निरीक्षक पदावर कार्यरत असणारे



विलास गावंडे आणि सौ.शालिनी गावंडे यांचे ते चिरंजीव असून जिद्द, चिकाटी, कठीण परिश्रम तसेच गुरुजन आणि आई - वडिलांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आपण हे यश संपादन केले असल्याचे आदित्य याने सांगितले.

**अंगवाडी महिला कर्मचारी सह पतसंस्था म. जालना कार्यालय :- प्रियदर्शनी बँक शेजारी, रहिमान गंज जालना - ४३१२०३**

दि. १९/०७/२०२६
जा. क्रं ०९/२०२६

**२५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

फक्त सभासदासाठी

मा. सर्व सभासद भगिनींना या नोटीसाव्दारे कळविण्यात येते की, शनिवार दिनांक ०१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेचे कार्यालय प्रियदर्शनी बँक शेजारी, रहिमान गंज, जालना येथे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कांताताई मिटकरी यांच्या अध्यक्षतेखाली २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली असून या सभेमध्ये खालील विषयावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात येणार आहे. तरी आपली उपस्थिती आवश्यक आहे.

**सभेपुढील विषय :**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. साल सन २०२५-२०२६ चे आर्थिक पत्रके स्विकृत करणे बाबत
३. साल सन २०२६-२०२७ चे अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करणे बाबत
४. लेखापरिक्षण दोष दुरुस्तीस मान्यता देणे बाबत.
५. लेखा परिक्षकाची सन २०२६-२०२७ या वर्षासाठी नियुक्ती करणे बाबत
६. मागील सभासद लाभांष रक्कम गंगाजळीमध्ये विलीन करणे बाबत.
७. अंदाज पत्रकापेक्षा कमी/ जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
८. साल सन २०२५-२०२६ साठी संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे.
९. अध्यक्षाच्या परवानगीचे ऐन वेळेचे विषय

**सभेचे ठिकाण :-** संस्थेचे कार्यालय प्रियदर्शनी बँकेच्या बाजूस रहेमान गंज, नवा जालना

**सभा दिनांक -** ०१-०८-२०२६
**वेळ :-** सकाळी
**ठिक :-** ११.००

**स्वाक्षरीत/-**
**व्यवस्थापक**
**अंगणवाडी महिला कर्मचारी सहाकरी पतसंस्था मर्यादित जालना**

**टिप.** १. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल यासाठी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. सभासदांनी उपस्थित रजिस्टर वर स्वाक्षरी करावे.
३. सभासदांनी त्यांच्या तक्रारी/ प्रश्न असतील ते सभेपुर्वी दि. ३१-०७-२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत दाखल करावे, नंतर ऐन वेळी प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही.

## कर्जमाफीच्या निकषात मोठा बदल; २०१९ मध्ये लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही मिळणार २०२६ योजनेचा लाभ

**जालना - प्रतिनिधी**

राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ मध्ये महत्त्वाचे बदल करत हजारो शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. १५ जुलै २०२६ रोजी सहकार विभागाने शासन निर्णय जारी करून कर्जमाफीच्या पात्रतेचे निकष अधिक सुलभ केले आहेत.

यापूर्वी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ चा लाभ घेतलेल्या अनेक शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळण्यात आले होते. आता सरकारने हा निर्णय बदलत अशा शेतकऱ्यांनाही नव्या योजनेचा लाभ देण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

नवीन निर्णयानुसार, १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीककर्ज किंवा पुनर्गठित (रीशेड्युल/रिफायनान्स) कर्ज, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असेल आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नसेल, तर अशा कर्जदारांना जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. सरकारने योजनेतील एकरकमी समझोता संबंधीचे काही निर्बंधही हटवले असून प्रोत्साहनपर लाभासाठी असलेली २०२६-२७ या आर्थिक वर्षाची अटही रद्द करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात केलेल्या घोषणेनंतर मंत्रिमंडळाने हा निर्णय मंजूर केला होता. त्यानुसार शासनाने सुधारित आदेश काढला आहे.

या निर्णयामुळे *(पान २ वर)*

### उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विशेष तपासणी मोहिमेत

## ६० बसेसची तपासणी व २६ वाहनांवर कारवाई १ लाख ९० हजाराचा दंड वसूल

**जालना - प्रतिनिधी**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनीष दौंड यांच्या मार्गदर्शनाखाली उप प्रादेशिक परिवहन कार्यालय. जालना यांच्या वायुवेग पथकाने विशेष तपासणी मोहीम राबवून एकूण ६० बसेसची तपासणी केली. सदर कारवाईत मोटार वाहन निरीक्षक फारुक एस. शेख, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अभिजित के. बावसकर तसेच वाहन चालक ज्ञानेश्वर निळे यांनी सहभाग घेतला.

तपासणी दरम्यान २६ बसेसमध्ये मोटार वाहन कायद्याचे विविध उल्लंघन आढळून आले. त्यामध्ये प्रामुख्याने विनापरवाना वाहतूक. मोटार वाहन कर न भरणे इंडिकेटर टेल लाइट बंद असणे, केबिनमध्ये अनधिकृत प्रवासी वाहतूक करणे तसेच वाहनाच्या टपावर माल वाहतूक करणे अशा गंभीर स्वरूपाच्या त्रुटींचा समावेश होता. सदर उल्लंघनांबाबत संबंधित वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ व संबंधित नियमांनुसार कारवाई करण्यात आली असून एकूण १ लाख ९० हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय जालना यांच्यामार्फत सर्व बसचालक वाहनमालक तसेच प्रवासी वाहतूक व मालवाहतूक करणाऱ्या वाहनधारकांना आवाहन करण्यात येते की. रस्ते सुरक्षितता, प्रवाशांची सुरक्षितता आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांविरुद्ध भविष्यातही अशाच प्रकारे सातत्याने *(पान २ वर)*

## व्यापाऱ्याची पैशांची बॅग हिसकावून जबरी चोरी; अवघ्या २४ तासांत चार आरोपी जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, ₹५.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त, 'खबऱ्या'च्या मदतीने रचला होता कट

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील व्यापाऱ्याला खंजीराचा धाक दाखवून जवळपास पाच लाख रुपयांची रोकड असलेली बॅग हिसकावून नेणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांच्या आत पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून सुमारे ₹५ लाख ७२ हजार ५०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे व्यापाऱ्याकडे मोठी रक्कम असल्याची माहिती टोळीला त्यांच्या एका साथीदारानेच पुरविल्याचे



तपासात उघड झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. खंजीराचा धाक दाखवत व्यापाऱ्याला लुटले

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जुलै २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास उमेश मधुसूदन बजाज (वय ३०), व्यवसायाने व्यापारी, रा. फाईन सफायर, गोल्डन ज्युबली शाळेमागे, जालना हे नवीन मोंढा परिसरातून जात असताना तीन अनोळखी युवकांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना अडवले.

आरोपींनी व्यापाऱ्याच्या गळ्याला खंजीर लावून जिवे मारण्याची धमकी दिली आणि त्यांच्या ताब्यातील ₹४ लाख ९६ हजारांची रोकड असलेली बॅग हिसकावून मोटारसायकलवरून पळ काढला. या घटनेमुळे *(पान २ वर)*

# संपादकीय....

## अहवालापेक्षा परिणाम महत्त्वाचा; काँग्रेससमोर जनविश्वास परत मिळविण्याचे मोठे आव्हान

जालना शहर काँग्रेसने प्रदेशाध्यक्षांसमोर दीड महिन्यातील आंदोलनांचा, सामाजिक उपक्रमांचा आणि संघटनात्मक कामांचा सविस्तर अहवाल सादर केला. कोणत्याही राजकीय पक्षासाठी आपल्या कामाचा लेखाजोखा वरिष्ठ नेतृत्वासमोर मांडणे ही चांगली संघटनात्मक परंपरा आहे. मात्र, अशा अहवालांचे खरे मूल्य हे त्यातील कार्यक्रमांच्या संख्येवर नव्हे, तर त्या कार्यक्रमांमुळे जनतेच्या प्रश्नांवर कितपत परिणाम झाला यावर ठरत असते.

अहवालात आंदोलने, निवेदने, अभिवादन कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, मतदार यादी पुनरिक्षणातील सहभाग, बूथस्तरीय संघटन आणि सत्याग्रह यांचा उल्लेख आहे. हे सर्व पक्षाच्या सक्रियतेचे निदर्शक असले, तरी आजचा मतदार केवळ आंदोलनांची संख्या मोजत नाही; तो त्यातून काय बदल घडला, कोणता प्रश्न सुटला आणि त्याच्या दैनंदिन आयुष्याला काय फायदा झाला, हे पाहतो. जालना शहरात पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, बेरोजगारी, अतिक्रमण, स्वच्छता, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि नागरी पायाभूत सुविधांचे अनेक प्रश्न कायम आहेत. विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसने या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणे अपेक्षितच आहे. पण निवेदन दिल्यानंतर त्या प्रश्नांचा पाठपुरावा किती झाला, प्रशासनाकडून काय निर्णय झाले आणि नागरिकांना काय दिलासा मिळाला, याचे उत्तरही जनतेला अपेक्षित आहे. डॉ. विशाल धानुरे यांनी संघटन विस्तार, बूथस्तरावरील मजबुतीकरण आणि नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीवर भर दिला आहे. निवडणुका जिंकण्यासाठी मजबूत संघटना ही निश्चितच आवश्यक असते. मात्र, संघटना केवळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांनी मजबूत होत नाही; ती कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागाने आणि जनतेच्या विश्वासाने उभी राहते. हा विश्वास मिळविण्यासाठी पक्षाला सातत्यपूर्ण जनसंपर्क आणि प्रश्न सोडविण्याची क्षमता दाखवावी लागेल. मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग, प्रशिक्षण शिबिरे आणि बूथ व्यवस्थापन याकडे काँग्रेसने लक्ष दिले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने ही रणनीती महत्त्वाची ठरू शकते. परंतु निवडणूक व्यवस्थापनाइतकेच महत्त्वाचे म्हणजे मतदारांच्या मनात विश्वास निर्माण करणे. संघटनात्मक तयारी आणि जनाधार यामध्ये संतुलन साधणे ही पक्षासमोरील खरी कसोटी असेल. प्रदेश नेतृत्वाने अहवालाची दखल घेतली, असे पक्षाकडून सांगितले जात आहे. परंतु अंतिम निर्णय मतदारच देतात. त्यांच्यासाठी अहवालातील आकडे किंवा बैठका महत्त्वाच्या नसतात; त्यांच्या जीवनात झालेले बदल महत्त्वाचे असतात. आज काँग्रेससमोर केवळ संघटना मजबूत करण्याचे नव्हे, तर पर्यायी आणि विश्वासार्ह राजकीय पर्याय म्हणून स्वतःची प्रतिमा उभी करण्याचे आव्हान आहे. जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष, प्रभावी पाठपुरावा, सकारात्मक पर्याय आणि तळागाळातील विश्वास यांची सांगड घातली तरच अहवालातील कामांचे रूपांतर राजकीय यशात होऊ शकते. अन्यथा कितीही सविस्तर अहवाल सादर झाले, तरी त्यांची नोंद कागदावरच राहण्याचा धोका कायम राहील.

## आ. बबनराव लोणीकर यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; वाटूर फाटा येथे शेगाव-पंढरपूर दिंडी मार्गालगत इंटरचेंज मंजूर

**परतुर - प्रतिनिधी**

जालनानांदेड समृद्धी महामार्गावर शेगावपंढरपूर (राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-सी) मार्गालगत वाटूर फाटा येथे इंटरचेंज मंजूर करण्याच्या आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण मागणीला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) मुख्य अभियंता संगीता जैस्वाल यांनी आमदार लोणीकर यांना पाठविलेल्या पत्राद्वारे ही माहिती दिली आहे. त्यानुसार साखळी क्र. ४४/०५० ते ४६/२५० दरम्यान इंटरचेंजची तरतूद मूळ प्रकल्पाच्या आराखड्यात करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. यामुळे परतूर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण मराठवाड्याच्या दळणवळणाला नवे बळ मिळणार आहे. या मागणीसाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी केवळ निवेदनांवर न थांबता नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथराव शिंदे यांची व्यक्तिशः दोन वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन वाटूर फाटा येथे इंटरचेंज मंजूर करण्याची आग्रही मागणी केली होती. मराठवाड्याच्या विकासासाठी या इंटरचेंजचे महत्त्व त्यांनी दोन्ही नेत्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतरही त्यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला.

यानंतर आमदार बबनराव लोणीकर यांनी उपमुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून वाटूर फाटा येथे इंटरचेंज उभारण्याची ठोस मागणी केली होती. शेगावपंढरपूर राष्ट्रीय महामार्ग, छत्रपती संभाजीनगरजालनानांदेड राष्ट्रीय महामार्ग आणि समृद्धी महामार्ग यांची प्रभावी जोडणी या इंटरचेंजमुळे होणार असल्याचे त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. या मागणीची दखल घेत एमएसआरडीसीने मूळ प्रकल्पातच इंटरचेंजचा समावेश केल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे लोणीकर यांच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे वाटूर फाटा इंटरचेंजचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मागणी प्रत्यक्षात साकार झाली असून त्यांनी याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथराव शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. या निर्णयामुळे मराठवाड्यातील दळणवळण अधिक गतिमान होणार असून वारकरी, शेतकरी, व्यापारी, उद्योग क्षेत्र तसेच पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. हा निर्णय परतूर विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास आमदार लोणीकर यांनी व्यक्त केला आहे.

या इंटरचेंजमुळे वारकरी संप्रदायाला मोठा लाभ होणार आहे. शेगाव ते पंढरपूर दिंडी मार्गाने प्रवास करणाऱ्या लाखो भाविकांना जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. त्याचबरोबर लोणारचे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ, संत जनाबाई यांचे जन्मस्थान गंगाखेड, साईबाबांचे जन्मस्थान पाथरी, समर्थ रामदास स्वामींचे जन्मस्थान जांब समर्थ, बरबडा येथील सूर्य मंदिर, नांगरतास-गोखुरेश्वर शंभू महादेव देवस्थान यांसारख्या धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज चौदावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

''बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता.....'' आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....

राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## अजिंठा चित्रकला महाविद्यालय जालना च्या एटीडी द्वितीय वर्षाचा निकाल शंभर टक्के

**जालना - प्रतिनिधी**

कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या शासकीय उच्च कला परीक्षा२०२६ मधील कलाशिक्षक पदविका () द्वितीय वर्ष परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत अजिंठा चित्रकला महाविद्यालय, जालना यांनी शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय परंपरा कायम राखत पुन्हा एकदा उज्ज्वल यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील एकूण २१ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ७



विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत, तर उर्वरित सर्व विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होत महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे.

या परीक्षेत सदाफुले सुनिता सखाराम हिने प्रथम क्रमांक, भालेराव सुयश गणेश याने द्वितीय क्रमांक, तर शेगोकर सुनीता बबन हिने तृतीय क्रमांक मिळवून विशेष प्राविण्य संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य शाह एजास एम., प्रा. सुनील सोलाट, प्रा. दिपक अंकलखोपे, प्रा. स्वप्नील रगडे, प्रा. गजानन शेळके, डी. देशमुख, प्रा. मिर्झा उजेर, प्रा. भाऊसाहेब दिवेकर, पीस फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक मिर्झा अफसर, मा. शिक्षणाधिकारी वहिद सर, इंजिनिअर मोईन शेख, मा. कलाशिक्षक संतोष जोशी, प्रा. रणजितसिंह बायस, मिर्झा उझेर, राजीव जिरेमाळी तसेच राहुल छडीदार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण अध्यापन, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे हे यश संपादन झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या यशामुळे जालना जिल्ह्यातील कला शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

# पान १ व ४ वरुन...

### टेंभुर्णी - कुंभारझरी...

करावी., भविष्यात अशा निष्कृष्ट कामांवर कठोर कारवाई करून दर्जेदार विकासकामांची हमी द्यावी. स्थानिकांच्या मते, ''हा रस्ता केवळ विकासाचा नाही, तर हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. त्यामुळे प्रशासनाने आणखी विलंब न करता तातडीने ठोस पावले उचलावीत,'' अशी एकमुखी मागणी परिसरातून होत आहे.

### जालना पोलिसांचा...

आवश्यक सूचना देण्यात येणार आहेत. नागरिकांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा

जालना पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ज्यांच्या पोलीस ठाण्यांमध्ये अर्ज किंवा तक्रारी प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित पोलीस ठाण्यात उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडाव्यात. या विशेष मोहिमेच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. विश्वास वाढविण्याचा प्रयत्न पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे. नियमित कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच नागरिकांच्या अडचणी वेळेत सोडविण्यावरही जालना पोलीस भर देत असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट होत आहे. ''आपली तक्रार, आमचे कर्तव्य जलद निवारण, आपले समाधान'' या घोषवाक्यासह राबविण्यात येणाऱ्या या विशेष तक्रार निवारण दिनाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जालना पोलिसांनी केले आहे.

### कर्जमाफीच्या...

नैसर्गिक आपत्ती, आर्थिक संकट आणि सततच्या शेतीतील अडचणींमुळे कर्जबाजारी झालेल्या लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### उप प्रादेशिक...

कठोर कारवाई करण्यात येणार आहे. अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### व्यापाऱ्याची...

व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तांत्रिक तपास आणि खबऱ्यांच्या माहितीवरून गुन्हा उघड

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपास करून आरोपींना अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी विशेष पथक तयार करून तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि गोपनीय माहितीदारांच्या माध्यमातून तपास सुरू केला.

या तपासादरम्यान गुन्हा करणाऱ्या टोळीचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी चारही संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

इनसाइड इन्फॉर्मेशनवरून रचला होता कट तपासात धक्कादायक बाब समोर आली. व्यापारी उमेश बजाज यांच्याकडे मोठी रोकड असल्याची माहिती आरोपी आरिफ रहिमोद्दीन अन्सारी याने आपल्या साथीदारांना दिली होती. त्यानंतर ही संपूर्ण लूट पूर्वनियोजित पद्धतीने करण्यात आली. माहिती मिळाल्यानंतर तीन आरोपींनी व्यापाऱ्याचा पाठलाग करून योग्य संधी साधत खंजीराचा धाक दाखवून लूट केली. अटक करण्यात आलेले आरोपी अयान ऊर्फ पंच्यान्नव अमजद अली (२०), रा. हिंदनगर, जालना, शेख उमर शेख रहीम (१८), रा. गुंडेवाडी, जालना, शेख अब्दुल शाहिद ऊर्फ मीटर शेख रशिद (२०), रा. हिंदनगर, जालना आरिफ रहिमोद्दीन अन्सारी (२८), रा. हिंदनगर, जालना.

₹५.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त आरोपींकडून पोलिसांनी पुढील मुद्देमाल जप्त केला आहे. ₹४,८१,५०० रोख रक्कम, ₹५०,००० किमतीची गुन्ह्यात वापरलेली हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल, ₹४०,००० किमतीचे चार मोबाईल फोन, ₹१,००० किमतीचा एक खंजीर, फिर्यादीची पैशांची बॅग. एकूण ₹५,७२,५०० किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. गुन्हा घडल्यानंतर अल्पावधीतच आरोपींना जेरबंद करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल हस्तगत करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या कारवाईमुळे व्यापारी वर्गात समाधान व्यक्त होत असून, शहरात वाढत्या जबरी चोरीच्या घटनांवर पोलिसांनी प्रभावी अंकुश ठेवला असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या अधिकाऱ्यांनी बजावली महत्त्वाची भूमिका ही कारवाई पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहायक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, लक्ष्मीकांत आडेप, दत्ता वाघुंडे, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, शिवप्रसाद एखंडे, रमेश काळे, कैलास चेके, योगेश सहाणे, धीरज भोसले आणि सुनील पवार यांनी संयुक्तपणे पार पाडली. या यशस्वी कारवाईमुळे जालना पोलिसांनी पुन्हा एकदा गंभीर स्वरूपाचा गुन्हा अल्पावधीत उघडकीस आणत गुन्हेगारांना कायद्याचा धाक दाखवला आहे.

### जालन्यात २५...

नाही याची विशेष काळजी घेण्यात यावी, अशा सूचना केल्या. यावेळी उपमहापौर राजेश राऊत यांनी सांगितले की, महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी आज पालखी मार्गाला भेट दिली असून सोयीसुविधानाबाबत आढावा घेतला आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केलेल्या सूचनेनुसार पालिकेच्या कर्मचाऱ्यांना सांगितले जाईल, अशी ग्वाही दिली.

### सोनम वांगचुक...

यासह शासनाच्या विरोधात विविध प्रकारच्या घोषणा शिवसैनीकडून देण्यात आल्या. यावेळी धरणे आंदोलनाला शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश पा. गव्हाड, परमेश्वर जगताप, तालुका प्रमुख कुंडलिक पा. मुठ्ठे,तालुका युवा अधिकारी मुकेश माकोडे, ज्येष्ठ शिवसैनिक जनार्दन झोरे, चंदू शिंदे, विष्णू लोखंडे,गोविंदा माकोडे,नंदकिशोर भालके,समाधान चव्हाण,पंढरी उगले,विनोद शेळके, गजानन मुळे,दगडू तांबेकर, नागोराव बंगाळे,मोहम्मद फैसल,शेख इरफान, समीर शहा,सलमान पठाण,परमेश्वर सरोदे, बाबुराव मुळे,राजू लोखंडे अशपाक कुरेशी यासह आदी शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकशाही...

मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना ://.. या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

### पालकमंत्री पंकजा...

आणि समितीचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

### मोफत नेत्र...

रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून त्यांच्यासाठी पुढील उपचाराची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच गरजू नागरिकांना दर्जेदार चष्मे नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात आले. लायन्स नेत्र रुग्णालयाच्या अत्याधुनिक फिरत्या नेत्रसेवा वाहनामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात न जाता गावातच दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध झाली. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. शिबिराला विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी,सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी ग्रामीण भागात अशा प्रकारचे आरोग्य शिबिर नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शिबिर समन्वयक सचिन आडे व शुभम दाभाडे,नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.मंथन बदर,डॉ.सुमित गवळी,डॉ.अनघा डोळसकर तसेच तंत्रज्ञ अमोल भुजंग,रोहन शिंदे,अविनाश सोनवणे आणि भरत पाटणकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाचे आयोजन शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.आर.व्ही.छल्लारे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दारीच दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### स्व. गजानन तौर...

कार्यक्रमाला नगरसेवक महावीर ढक्का, सभापती संध्या देठे, अक्षय गोरंट्याल, गट नेते महेश निकम,नगरसेवक दिनेश भगत ,सभापती सुजित जोगस, मनोज इंगळे, महेश दुसाने, महेश नळगे यांच्यासह विविध सामाजिक संस्था, व्यापारी, उद्योगपती, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. गजानन तौर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी रक्तदान शिबिरासह आरोग्य, शिक्षण, सामाजिक जनजागृती आणि जनहिताचे विविध उपक्रम राबविले जातात. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सेवाभावी कार्यातून त्यांची आठवण जिवंत ठेवण्याचा फाऊंडेशनचा प्रयत्न असल्याचे कल्याणी तौर यांनी सांगितले. आमदार हिकमत उढाण म्हणाले की, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. स्व. गजानन तौर फाऊंडेशनने स्मृतिदिनानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून एक आदर्श निर्माण केला आहे. ५०९ जणांनी केलेले रक्तदान ही केवळ संख्या नसून समाजातील सेवाभाव आणि मानवतेची जाणीव अधोरेखित करणारी बाब आहे. अशा उपक्रमांमुळे तरुण पिढी सामाजिक कार्याकडे प्रेरित होत आहे. आमदार नारायण कुचे म्हणाले की, स्व. गजानन तौर यांनी समाजसेवेचा जो विचार जपला, तो फाऊंडेशन आजही तितक्याच ताकदीने पुढे नेत आहे. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यात शेकडो युवकांचा सहभाग ही आनंदाची बाब आहे. समाजासाठी निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचे अभिनंदन करावे तेवढे कमी आहे. अशा सेवाभावी उपक्रमांना भविष्यातही माझे पूर्ण सहकार्य राहील, असे ते म्हणाले.

### जालन्यात रविवारी....

असून, दर्जेदार व आकर्षक वस्तू ग्राहकांसाठी उपलब्ध करून देणार आहेत. जालना शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या कुटुंबासह या भव्य एक्स्पोला भेट देऊन खरेदीचा व खाद्यपदार्थांचा आनंद घ्यावा, असे आवाहन अग्रवाल महिला मंडळाच्या अध्यक्षा हेमा अग्रवाल, सचिव सोनल सिंघल, कोषाध्यक्षा नीता बगडिया, अग्र-नारी, जालना जिल्हाध्यक्ष डॉ. अनिता तवरावाला, सचिव उषा अग्रवाल, कोषाध्यक्षा कोमल देवीदान यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### नीट परीक्षेत...

पर्सेंटाईल, बायोलॉजी (जीवशास्त्र - बॉटनी व झूलॉजी): ९५.१६२९९६१ पर्सेंटाईल, केमिस्ट्री (रसायनशास्त्र): ९३.८६६५२८० पर्सेंटाईल श्रुतीने मिळवलेल्या या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिने ६६,०१३ वा ऑल इंडिया रँक (- ) पटकावला आहे. जनरल-ईडब्ल्यूएस (-) या प्रवर्गातून स्पर्धा करताना तिने देशात ८,३२९ वा कॅटेगरी रँक मिळवला असून, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवण्याच्या आपल्या शक्यता अधिक बळकट केल्या आहेत. श्रुतीचे वडील भरत आणि आई सुनीता यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश संपादन केले आहे. अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत श्रुतीने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे नातेवाईक, शिक्षक आणि मित्रपरिवाराकडून भरभरून कौतुक केले जात आहे. कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावरच हे यश मिळवणे शक्य झाले, अशा भावना श्रुतीने व्यक्त केल्या आहेत. भविष्यात एक उत्तम डॉक्टर बनून देशाची सेवा करण्याचे श्रुतीचे स्वप्न असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा!

# मृत व्यक्तीचाही प्रीमियम घेणाऱ्या विमा कंपनीला ग्राहक मंचाचा दणका

**जालना – प्रतिनिधी**

दिल्ली जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने (उत्तर जिल्हा) एका महत्त्वपूर्ण निकालात युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या मनमानी कारभाराला चपराक लगावली आहे. वडिलांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या नावावर प्रीमियम वसूल करणाऱ्या आणि पॉलिसीचे नूतनीकरण करण्यास नकार देणाऱ्या विमा कंपनीला आयोगाने केवळ सेवेतील त्रुटीसाठी दोषी ठरवले नाही, तर पीडित ग्राहकाला एक लाख रुपयांची नुकसान भरपाई आणि खटल्याचा खर्च देण्याचे आदेशही दिले आहेत. नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत केले असून, हा निकाल देशभरातील ग्राहकांसाठी एक आशेचा किरण असल्याचे म्हटले आहे. श्री. कमल भाटिया विरुद्ध युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. या ग्राहक तक्रार क्रमांक: ५४/२०१९ च्या खटल्यात हा ऐतिहासिक निर्णय देण्यात आला.

या प्रकरणातील तक्रारदार श्री. कमल भाटिया यांनी त्यांच्या आई-वडिलांसाठी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीकडून फॅमिली फ्लोटर पॉलिसी घेतली होती. दुर्दैवाने, डिसेंबर २०१६ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर, २०१७ मध्ये पॉलिसीच्या नूतनीकरणावेळी श्री. भाटिया यांनी विमा कंपनीला वडिलांचे नाव कमी करून केवळ आईच्या नावे पॉलिसी सुरू ठेवण्याची आणि प्रीमियमची रक्कम कमी करण्याची विनंती केली. मात्र, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना आश्वासन देऊन वडिलांच्या नावासाहित संपूर्ण प्रीमियम भरण्यास सांगितले आणि ही रक्कम नंतर समायोजित केली जाईल असे सांगितले. परंतु २०१८ मध्ये नूतनीकरणाची वेळ आली असता, कंपनीने आपले आश्वासन पाळले नाही आणि उलट ही पॉलिसी कमी फायद्याच्या ज्येष्ठ नागरिक पॉलिसीमध्ये रूपांतरित करण्यास सांगितले, जे तक्रारदाराला मान्य नव्हते.

विमा कंपनीने केवळ तक्रारदाराच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले नाही, तर त्यांच्या कायदेशीर नोटिशीला उत्तरही दिले नाही. ग्राहक आयोगासमोर सुनावणीदरम्यान, कंपनीने अत्यंत निष्काळजीपणा दाखवत असंबद्ध आणि दुसऱ्या प्रकरणातून कॉपी-पेस्ट केलेला युक्तिवाद सादर केला. आयोगाने आपल्या निरीक्षणात हे स्पष्ट केले की, विमा कंपनीने तक्रारदाराच्या समस्येचे निराकरण करण्यात पूर्णपणे अपयश दाखवले आहे, जे सेवेतील त्रुटी या व्याख्येत बसते. कंपनीच्या या बेजबाबदार वृत्तीमुळे तक्रारदाराला प्रचंड मानसिक त्रास आणि मनस्ताप सहन करावा लागला, ज्यामुळे त्याला न्यायासाठी आयोगाकडे धाव घ्यावी लागली.या सर्व बाबींचा विचार करून, आयोगाने विमा कंपनीला पीडित ग्राहकाच्या आईच्या नावे सर्व लाभांसह फॅमिली मेडिकेअर पॉलिसी पूर्ववत सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच, वडिलांच्या निधनानंतर आकारण्यात आलेला अतिरिक्त प्रीमियम समायोजित करून सुधारित प्रीमियम आकारण्याचे आदेश दिले. यासोबतच, तक्रारदाराला झालेल्या मानसिक त्रासापोटी १,००,००० रुपये नुकसान भरपाई आणि खटल्यासाठी आलेला खर्च म्हणून २१,००० रुपये ३० दिवसांच्या आत देण्याचा महत्त्वपूर्ण आदेश दिला. या मुदतीत रक्कम न दिल्यास त्यावर वार्षिक ९% व्याज आकारले जाईल, असेही निकालात स्पष्ट करण्यात आले आहे. या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हा निकाल विमा कंपन्यांच्या मनमानी कारभारावर एक मोठा आघात आहे. अनेकदा विमा कंपन्या क्लिष्ट नियम आणि अटींचा आधार घेऊन सामान्य ग्राहकांची पिळवणूक करतात. दिल्ली ग्राहक आयोगाचा हा निर्णय अशा कंपन्यांसाठी एक कठोर संदेश आहे. या निकालातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालनासारख्या भागातील नागरिकांनी बोध घेतला पाहिजे. कोणत्याही मोठ्या कंपनीच्या दबावाखाली न येता आपल्या हक्कांसाठी जागरूक राहिले पाहिजे. जर कोणतीही विमा कंपनी सेवेत त्रुटी ठेवत असेल किंवा अन्यायकारक वागणूक देत असेल, तर ग्राहकांनी न घाबरता ग्राहक आयोगाकडे दाद मागावी. हा निकाल हे सिद्ध करतो की कायद्याच्या चौकटीत सामान्य माणसालाही न्याय मिळू शकतो.'

## तृतीयपंथी नागरिकांसाठी आधार नोंदणी व आधार अद्ययावतीकरण विशेष शिबिर

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील तृतीयपंथी नागरिकांना आधार नोंदणी व आधार अद्ययावतीकरण () सुविधा सुलभरीत्या उपलब्ध करून देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता समाज कल्याण कार्यालय, जालना येथे करण्यात आले आहे.

या विशेष शिबिरामध्ये नवीन आधार नोंदणी, आधारमधील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, ई-मेल तसेच आवश्यक त्या इतर बाबींचे अद्ययावतीकरण करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथी नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. शिबिरास येताना आपल्या उपलब्ध असलेले आवश्यक ती मुळ कागदपत्रे व उपलब्ध असल्यास जुने आधार कार्ड सोबत आणावेत.

तृतीयपंथी नागरिकांना शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ घेण्यासाठी आधार अद्ययावत असणे आवश्यक असल्याने जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथी नागरिकांनी या विशेष शिबिरास उपस्थित राहून आधार नोंदणी अथवा अद्ययावतीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जालना मनपेच्या विविध मक्त्यांचा जाहीर लिलाव यशस्वी; ११ मक्त्यांतून तबल ₹८५.७५ लाखांचा विक्रमी महसूल

### आयुक्त अंजली शर्मा यांच्या दालनात प्रथमच पारदर्शक पद्धतीने लिलाव; शहराच्या विकासासाठी महसूल खर्च होणार

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागांतर्गत येणाऱ्या विविध दैनंदिन बाजार, आठवडी बाजार तसेच इतर व्यावसायिक मक्त्यांचा जाहीर लिलाव शुक्रवारी (१७ जुलै) अत्यंत पारदर्शक आणि स्पर्धात्मक वातावरणात पार पडला. मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्या दालनात प्रथमच थेट लिलाव प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. या लिलावाला बोलीधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने मनपाच्या तिजोरीत ₹८५ लाख ७५ हजार २८८ इतका विक्रमी महसूल जमा झाला आहे.

या महसुलातून शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा आणि इतर मूलभूत विकासकामांना गती मिळणार असल्याचा विश्वास मनपा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

**पारदर्शक प्रक्रियेमुळे वाढला विश्वास**

यापूर्वी मक्ते प्रक्रियेबाबत विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित होत असत. मात्र यावेळी आयुक्त अंजली शर्मा यांच्या थेट देखरेखीखाली संपूर्ण प्रक्रिया खुल्या पद्धतीने, नियमांचे पालन करून आणि सर्व बोलीधारकांच्या उपस्थितीत पार पडली. त्यामुळे प्रक्रियेवर विश्वास वाढल्याचे उपस्थित बोलीधारकांनीही सांगितले.

प्रत्येक मक्त्यासाठी स्पर्धात्मक बोली लावण्यात आल्याने मनपाला अपेक्षेपेक्षा अधिक महसूल मिळाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

**११ महत्त्वाच्या मक्त्यांसाठी चुरशीची बोली**

लिलावात शहरातील प्रमुख बाजारपेठा, आठवडी बाजार, धार्मिक उत्सव तसेच उद्यानांशी संबंधित एकूण ११ मक्त्यांसाठी बोली प्रक्रिया पार पडली.

**यशस्वी बोलीधारक व मंजूर रक्कम**

| मक्ता | यशस्वी बोलीधारक | रक्कम |
|---|---|---|
| महात्मा फुले मार्केट दैनंदिन जमीन भाडे वसुली | गंगालाल मगनलाल भुरेवाल | ₹१५,११,००० |
| महात्मा फुले मार्केट गणेश मूर्ती विक्री | योगेश अशोक सोळंके | ₹४,५०,००० |
| नूतन वसाहत दैनंदिन बाजार | तुषार विजय सुरडकर | ₹८,४०,००० |
| रविवार आठवडी बाजार | तुषार विजय सुरडकर | ₹७,१०,००० |
| सोमवार आठवडी बाजार | शिवाजी दत्ता लाड | ₹२,६०,००० |
| मंगळवार आठवडी बाजार | मुकेश माणिकराव बनकर | ₹४,००,००० |
| बुधवार आठवडी बाजार | गोपीचंद परभत लोखंडे | ₹३,२०,००० |
| शुक्रवार आठवडी बाजार | मुकेश माणिकराव बनकर | ₹३,६०,००० |
| दुर्गादिवी नवरात्र महोत्सव जमीन भाडे | गणेश प्रेमचंद भगत | ₹९,२४,२८८ |
| छत्रपती संभाजी महाराज उद्यान (मोती तलाव) मासेमारी मक्ता | योगेश अशोक सोळंके | ₹१४,३०,००० |
| छत्रपती संभाजी महाराज उद्यानातील विविध मक्ते | यश भाऊसाहेब सतकर | ₹१३,७०,००० |

एकूण महसूल : ₹८५,७५,२८८

**मनपाच्या उत्पन्नात मोठी भर**

या लिलावामुळे मनपाला मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळाले आहे.

महानगरपालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नात वाढ झाल्याने विकासकामांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी हा निधी महत्त्वाचा ठरणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

नागरिकांच्या सुविधांसाठी निधी वापरणार आयुक्त अंजली शर्मा

यावेळी आयुक्त अंजली शर्मा यांनी सांगितले की, मनपाच्या मालमत्तांचे योग्य नियोजन आणि पारदर्शक व्यवस्थापन केल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेचे उत्पन्न वाढू शकते. लिलावातून प्राप्त झालेला महसूल शहरातील मूलभूत नागरी सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर विकासकामांवर खर्च करण्यात येणार असून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

अधिकाऱ्यांची उपस्थिती

या लिलाव प्रक्रियेदरम्यान आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह उपायुक्त नंदा गायकवाड, उपायुक्त त्र्यंबक कांबळे, मालमत्ता अधीक्षक राजेश चंदनशिवे, सभा लिपिक बंडू चव्हाण, मालमत्ता लिपिक गजानन सोनवणे तसेच मालमत्ता विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

महसूलवाढीच्या दिशेने सकारात्मक पाऊल

मनपाच्या उत्पन्नाचे स्रोत मजबूत करण्यासाठी बाजार, उद्याने आणि इतर सार्वजनिक मालमत्तांचे पारदर्शक व्यवस्थापन करण्याच्या धोरणाला या लिलावामुळे बळ मिळाले आहे.

## कुत्र्यांच्या हल्ल्यात मतदान अधिकारी गंभीर

**सोयगाव - प्रतिनिधी**

शासनाच्या एस आर आय मोहिमेत गृह भेटी देऊन अर्ज वितरण करणाऱ्या बी एल ओ वर मोकाट कुत्र्याने हल्ला चढवून गंभीर जखमी केल्याची घटना पिंपरी (माळेगाव) येथे शुक्रवारी सकाळी अकरा वाजता घडली. या घटनेत मतदान केंद्र अधिकारी यांना तातडीने उपचारासाठी सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

महादू पांडुरंग पंडित (वय ३८) असे कुत्र्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शिक्षकाचे नाव असून ते बी एल ओ म्हणून माळेगाव (पिंपरी) मतदान केंद्राचे काम पाहत आहेत. शुक्रवारी मतदारांचे एस आर आयचे फॉर्म वाटप व एस आर आय मोहीम राबविण्यात गृह भेटी देत असताना अचानक त्यांना गावातील मोकाट कुत्र्यांनी घेरले व त्यांना कडाडून चावे घेवून गंभीर जखमी केले.

## दिव्यांगांच्या हक्कासाठी नगरसेवक इमरान खान यांचे महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन

### घरकुल, जागा, मालमत्ता करात ५०% सवलत व मासिक मानधनाची आयुक्तांकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरातील प्रभाग क्रमांक ११ चे नगरसेवक इमरान खान अमानउल्ला खान यांनी दिव्यांग नागरिकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुढाकार घेत महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांना निवेदन सादर केले आहे. जालना शहरातील दिव्यांगांच्या प्रश्नांवर अधिकृतपणे निवेदन देणारे ते पहिले नगरसेवक असल्याचे चित्र सध्या समोर येत आहे.

नगरसेवक इमरान खान यांनी दिलेल्या निवेदनात जालना शहरातील पात्र दिव्यांग नागरिकांना घरकुल योजना व घरासाठी जागा उपलब्ध करून देणे, मालमत्ता करामध्ये ५० टक्के सवलत देणे तसेच दरमहा मानधन सुरू करणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, दिव्यांग नागरिकांना मूलभूत सुविधांचा लाभ मिळावा, त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी आणि त्यांना सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी या मागण्या तातडीने मंजूर कराव्यात.

या निवेदनावर नगरसेवक इमरान खान यांच्या स्वाक्षरीसोबत अपंग जनता दलाचे जालना जिल्हाध्यक्ष राहुल मुळे साबेर नुनुस शेख याची स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे दिव्यांगांच्या हक्कांसाठी सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधी एकत्र येत असल्याचे दिसून येत आहे.

दिव्यांगांच्या प्रश्नांवर महापालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा दिव्यांग बांधवांकडून व्यक्त केली जात आहे. नगरसेवक इमरान खान यांनी घेतलेल्या या पुढाकाराचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, दिव्यांगांच्या न्याय्य मागण्या पूर्ण करण्यासाठी महापालिकेने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

## नगरसोलकाचीगुडा एक्सप्रेसच्या दिरंगाईने हजारो प्रवासी संतप्त; रेल्वे प्रशासनाविरोधात जनआंदोलनाचा इशारा

### 'रेल्वे एक्स्प्रेसचे भाडे पण प्रवास पॅसेंजर सारखा'

**परतूर - प्रतिनिधी.**

''एक्सप्रेसचे पूर्ण भाडे भरायचे, पण प्रवास मात्र पॅसेंजर गाडीप्रमाणे करायचा... हा नेमका कोणता न्याय?'' असा संतप्त सवाल आता दररोज प्रवास करणारे हजारो प्रवासी रेल्वे प्रशासनाला विचारत आहेत. १७६६२ नगरसोलकाचीगुडा एक्सप्रेस ही गाडी सातत्याने होणाऱ्या विलंबामुळे आणि वारंवार इतर गाड्यांना मार्ग देण्यासाठी विविध स्थानकांवर थांबवली जात असल्याने प्रवाशांच्या रोषाचा विषय बनली आहे.

छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावरून दररोज विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, वकील, पत्रकार, डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, सरकारी अधिकारी, उद्योजक, व्यापारी आणि नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात परभणी, पूर्णा, नांदेड व पुढील भागात प्रवास करतो. सकाळच्या वेळेत या मार्गावर ही गाडी हजारो प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र एक्सप्रेस असूनही या गाडीचा वेग संथ राहतो आणि ती वारंवार विलंबाने धावत असल्याने प्रवाशांचे दैनंदिन नियोजन विस्कळीत होत आहे.

या संदर्भात रेल्वे प्रशासनाचे म्हणणे आहे की अंकाई ते नांदेड हा मार्ग सिंगल लाईन असल्यामुळे विविध गाड्यांच्या क्र ा ॅ सिं ग सा ठी १७६६२एक्सप्रेसला अनेक ठिकाणी थांबवावे लागते. मात्र या स्पष्टीकरणावर प्रवाशांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

प्रवाशांचे म्हणणे आहे की, ''अंकाईनांदेड मार्ग सिंगल लाईन असल्याची माहिती नवीन नाही. रेल्वेचे वेळापत्रक हे त्याच परिस्थितीचा विचार करून तयार केलेले असते. मग प्रत्येक वेळी एक्सप्रेसलाच का थांबवले जाते? दक्षिणेकडून येणाऱ्या इतर गाड्यांना सतत प्राधान्य का दिले जाते? सकाळच्या वेळेत छत्रपती संभाजीनगर ते परभणी, पूर्णा आणि नांदेड या मार्गावरील प्रवाशांसाठी हीच एकमेव महत्त्वाची एक्सप्रेस आहे. मग तिलाच वारंवार उशीर करून पॅसेंजरप्रमाणे का चालवले जाते?''

प्रवाशांनी लक्ष वेधले आहे की १७०५७ देवगिरी एक्सप्रेस सकाळी ४.१५ वाजता, तर १७६२९ पुणेहजूर साहेब नांदेड एक्सप्रेस सकाळी ५.०५ वाजता सुटते. त्यानंतर सकाळी ७.२० वाजता नगरसोलकाचीगुडा एक्सप्रेस हीच हजारो प्रवाशांसाठी उपलब्ध असलेली प्रमुख गाडी आहे. त्यामुळे या गाडीच्या वारंवार होणाऱ्या विलंबाचा सर्वाधिक फटका नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी आणि इतर नियमित प्रवाशांना बसत आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, ॲप, तसेच एक्स (ट्विटर) आणि इतर सामाजिक माध्यमांवर या समस्येबाबत सातत्याने तक्रारी करण्यात येत आहेत. मात्र त्यावर ठोस उपाययोजना होत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

प्रवाशांच्या प्रमुख मागण्या

- सकाळी ६.३० ते ७.०० दरम्यान छत्रपती संभाजीनगरपरभणी मार्गावर विशेष (स्पेशल) गाडी सुरू करावी.
- अथवा नगरसोलकाचीगुडा एक्सप्रेसला प्राधान्य देऊन एक्सप्रेसच्या दर्जानुसार वेळेत चालवावे.
- वारंवार होणाऱ्या विलंबाचे कारण आणि त्यावरील कायमस्वरूपी उपाय जाहीर करावेत.

रेल्वे प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा आणि नांदेड परिसरातील हजारो नियमित प्रवासी लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याची माहिती प्रवासी प्रतिनिधींनी दिली आहे.

'' एक्सप्रेसचे भाडे घेत असाल तर सेवा देखील एक्सप्रेसप्रमाणेच द्या; अन्यथा सकाळच्या वेळेत पर्यायी विशेष गाडी सुरू करा,'' अशी ठाम मागणी आता प्रवाशांकडून होत आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महाराजस्व अभियान व महारक्तदान शिबिर नियोजनासाठी बैठक

## महाराजस्व अभियान व महारक्तदान शिबिर यशस्वी करण्याचे आ.नारायण कुचे यांचे आवाहन

### रक्तदान हेच आपल्या नेत्याला सर्वोत्तम शुभेच्छा -भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यभर राबविण्यात येणाऱ्या महाराजस्व अभियान व महारक्तदान शिबिर या उपक्रमांच्या नियोजनासाठी भारतीय जनता पार्टी जालना महानगर व ग्रामीण जिल्ह्याची संयुक्त बैठक संपन्न झाली. आगामी कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी, रक्तदान शिबिराचे नियोजन, तसेच कार्यकर्त्यांचा सहभाग याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला. रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यातून समाजाप्रती आपली बांधिलकी जपत अधिकाधिक नागरिकांना या अभियानात सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले.





यावेळी जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर पाटील भांदरगे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती अशोक पांगारकर, उपनगराध्यक्ष विश्वजित खरात, सभापती संध्याताई देठे, जिजाबाई जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, गोविंद ढेंबरे, महेश निकम, सुनील खरे, अमोल धानुरे, संजय डोंगरे, भगवान मात्रे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ.नारायण कुचे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय जनता पार्टी ही केवळ राजकीय पक्ष नसून समाजसेवेचे व्रत जोपासणारी संघटना आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेले महाराजस्व अभियान व महारक्तदान शिबिर हे जनकल्याणाच्या भावनेतून राबविण्यात येणारे उपक्रम आहेत. प्रत्येक मंडळ, प्रत्येक शक्तिकेंद्र आणि प्रत्येक बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करावा. जास्तीत जास्त रक्तसंकलन आणि नागरिकांचा व्यापक सहभाग हेच आपल्या कार्याचे यश ठरेल.''

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाला नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न करता समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. महारक्तदान शिबिराच्या माध्यमातून रक्तदात्यांना जोडण्याचे तसेच महाराजस्व अभियानाद्वारे शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे.

प्रत्येक कार्यकर्त्याने ही जबाबदारी स्वतःची समजून पूर्ण ताकदीने कामाला लागावे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त होणारे सर्व कार्यक्रम जिल्ह्यात भव्य आणि यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीस भारतीय जनता पार्टी जालना महानगर व ग्रामीण जिल्ह्यातील पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# जालन्यात २५ जुलैपासून आनंदीस्वामींची यात्रा

## आ. अर्जुनराव खोतकर यांनी सोयी, सुविधा आणि सुरक्षेचा घेतला आढावा

**जालना - प्रतिनिधी**

येथील छोटे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. आनंदी स्वामींची आषाढीनिमित्त येत्या २५ जुलैपासून यात्रा सुरू होणार आहे. यानिमित्त आमदार अर्जुनराव खोतकर यांनी लाखो भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत यात्रेतील सोयी, सुविधा आणि सुरक्षेचा आढावा घेतला.



शांतता समितीच्या या बैठकीस उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख गणेशराव सुपारकर, माजी नगरसेवक शंकर लुंगे , मनोज इंगळे लक्ष्मणराव सुपारकर , संताजी वाघमारे,पोलीस उपअधीक्षक अनंतराव कुलकर्णी, पोलिस निरीक्षक शेवाळे,संस्थांचे अध्यक्ष रमेशराव ढोले, पालिका उपायुक्त विजय फुलंब्रीकर, नगर अभियंता सऊद, शाह आलमखान, इकबाल पाशा, राहुल सुपारकर महावितरण चे अभियंता राजाभाऊ नागरे आदी उपस्थित होते. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताना सांगितले की, श्री आनंदी स्वामींच्या यात्रेस सुमारे दोन लाखावर भाविक हजेरी लावतात. विशेषता महिलांची संख्या लक्षणीय असते. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी सुरक्षा आणि वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून विशेष खबरदारी घ्यावी. मंदिर परिसरात महिला पोलीस, साध्या विषयातील पोलीस आणि पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवावा. यात्रेच्या काळात या भागातील वीज अजिबात गायब होणार नाही याची खबरदारी घ्यावी. वीज वितरणचे कार्यकारी अभियंता यांना फोनवरून सूचना दिल्या तसेच यात्रेस कमी कालावधी असल्याने रस्त्यातील खड्डे तत्काळ बुजवावेत. नाल्यावर ढापे टाकावेत, पालखी मार्गात कुठेही अडचण आणि गैरसोय होणार (पान २ वर)

# जाफराबाद तालुक्यात वेळेत पाऊस न झाल्यास खरीपला धोका तालुक्यात बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यात मृग नक्षत्र संपून दीड महिना उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मात्र, हवामान खात्याने पुढील काही दिवसांत पावसाची शक्यता वर्तविल्याने वेळेत चांगला पाऊस झाल्यास खरीप पिकांना मोठा दिलासा मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.



तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी केली असली तरी पावसाअभावी पेरणीचा वेग मंदावला आहे. काही ठिकाणी पेरणीनंतर उगवलेली पिकेही पुरेशा ओलाव्याअभावी करपण्याच्या म ार्गावर असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

समाधानकारक पाऊस न झाल्याने अनेक शेतकरी पेरणी पुढे ढकलत आहेत. पेरणी झालेल्या शेतांमध्ये ओलावा टिकून न राहिल्यास पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच पाणवठे आटत असल्याने जनावरांसाठी पाणी व चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत असून विहिरी व अन्य जलस्रोतांतील पाणी कमी होत असल्याने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास रखडलेली पेरणी पूर्ण होण्यास मदत होईल.

तसेच उगवलेल्या पिकांना नवसंजीवनी मि ळून खरीप हंगामातील उत्पादन टिकवून ठेवण्यास हातभार लागेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांना तातडीने पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि आवश्यक कृषी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त होत आहे. पावसाचा विलंब कायम राहिल्यास शासनाने दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करून योग्य उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. सध्या जाफ्राबाद तालुक्यातील बळीराजा वेळेत चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत असून आकाशाकडे आशेने डोळे लावून बसला आहे.

# तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वाखाली तळतोंडी येथिल उपसरपंच मुकुंद गोटे यांचा शिवसेनेत प्रवेश

**मंठा - प्रतिनिधी**

मंठा तळतोंडी येथील उपसरपंच मुकुंद गोटे यांनी आपल्या समर्थक व सहकाऱ्यांसह शिवसेना पक्षात प्रवेश केला. शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला. माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे तसेच शिवउद्योग सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रल्हादभाऊ बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुकुंद गोटे यांनी शिवबंधन बांधून पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्षाच्या विचारांवर विश्वास व्यक्त करत आगामी काळात पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी कार्य करण्याचा




निर्धार त्यांनी व्यक्त केला.

प्रवेशप्रसंगी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गोटे यांचे समर्थक उपस्थित होते. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांच्या माध्यमातून तळतोंडी परिसरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, असा विश्वास तालुकाप्रमुख बोराडे यांनी व्यक्त केला. यावेळी उपतालुकाप्रमुख रामराव वरकड. शिव उद्योग आघाडी तालुका अध्यक्ष सतीशराव देशमुख, सतीशराव वायाळ, पिंटू वरकुटे, पवन वरकड, गोविंद वरकड, दत्ता वरकड, ज्ञानेश्वर वरकड, कृष्णा वरकड, विशाल वरकड, परमेश्वर वरकड, अभिषेक वायाळ, विठ्ठल वायाळ

# नीट परीक्षेत श्रुती मानकर हिचे घवघवीत यश!

## ७२० पैकी मिळवले ५२० गुण; ९६.६७ पर्सेंटाईलसह पटकावला ६६,०१३ वा ऑल इंडिया रँक

नवी दिल्ली - नॅशनल टेस्टिंग एजन्सीतर्फे घेण्यात आलेल्या देशातील अत्यंत प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा अर्थात नीट (-२०२६) परीक्षेचा निकाल काल, १६ जुलै २०२६ रोजी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत मानकर श्रुती भरत या विद्यार्थिनीने



अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. श्रुतीने या परीक्षेत ७२० पैकी तब्बल ५२० गुण मिळवून वैद्यकीय क्षेत्रातील आपल्या उज्ज्वल भविष्याच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले आहे.

२१ जून २०२६ रोजी पार पडलेल्या या अत्यंत कठीण परीक्षेत श्रुतीने तिन्ही विषयांत उत्तम गुण मिळवले आहेत. तिचा एकूण पर्सेंटाईल स्कोर ९६.६७२८७५३ ( ) इतका उत्कृष्ट आहे. तिची विषयनिहाय कामगिरी खालीलप्रमाणे आहे,

फिजिक्स (भौतिकशास्त्र): ९७.६५७२७७० (पान २ वर)

# सोनम वांगचुक यांना पाठिंब्यासाठी जाफराबाद तालुका शिवसेनेच्या वतीने धरणे आंदोलन




**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - अयोध्येतील प्रभू श्रीराम यांच्या मंदिरातील चोरी प्रकरणी आरोपींना कठोर शिक्षा व्हावी व नीट परीक्षा पेपर फुटीच्या विरोधात सोनम वांगचुक यांचे दिल्ली येथील जंतर मंतर वर सुरू असलेल्या अन्यायाग उपोषणाला पाठिंबा व शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा या मागणीसाठी जाफ्राबाद येथील हनुमान मंदिरात प्रभू श्रीरामाची आरती करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात तालुका शिवसेनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनावेळी या सरकारचे करायचे काय,खाली मुंडके वर पाय,धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या,प्रभू श्रीराम मंदिरातील चोरी प्रकरणी आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे (पान २ वर)

# पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली उद्या जिल्हा नियोजन समितीची बैठक

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत २६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे, त्या बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा अनुपालन अहवाल सादर करणे, तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व ओटीएसपी) सन २०२५-२६ मधील खर्चास मान्यता देण्याबाबत विचारविनिमय करण्यात येणार आहे.

याशिवाय जून २०२६ अखेर जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेऊन विविध विकासकामांच्या प्रगतीचे परीक्षण करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक बाबींवर चर्चा होणार असून, अध्यक्षांच्या मान्यतेने ऐनवेळच्या विषयांचाही समावेश करून त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समितीच्या या बैठकीस लोकप्रतिनिधी, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी (पान २ वर)

# वडीगोद्रीत मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मोफत नेत्र तपासणी शिबिरात २११ रुग्णांची तपासणी; २० मोतीबिंदू,५ रेटिना विकार व १२ गंभीर नेत्ररुग्ण आढळले

**वडीगोद्री - प्रतिनिधी**

मुख्यमंत्री जन आरोग्य शिबिर अभियानांतर्गत वडीगोद्री येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत मोतीबिंदू नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला पंचक्रोशीतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शिबिरात एकूण २११ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये २० रुग्णांमध्ये मोतीबिंदू,५ रुग्णांमध्ये रेटिना (डोळ्यात पडदा) विकार तर १२ रुग्णांमध्ये गंभीर नेत्रविकार आढळून आले असून संबंधित रुग्णांवर पुढील उपचाराची व्यवस्था करण्यात आली आहे.





महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, जिल्हा आरोग्य विभाग जालना,लायन्स नेत्र रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर आणि शांताई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक आरोग्य केंद्र, वडीगोद्री येथे शुक्रवारी (दि. १७) सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत हे शिबिर पार पडले. शिबिरात मोतीबिंदू, काचबिंदू,मधुमेहामुळे होणारे नेत्रविकार,कमी दृष्टी, धूसर दिसणे, रात्री कमी दिसणे, डोळे दुखणे, दृष्टीतील बदल आदी विविध नेत्रविकारांची अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने तज्ज्ञ डॉक्टरांनी मोफत तपासणी केली.मोतीबिंदू असलेल्या (पान २ वर)

# लोकशाही दिनाचे ३ ऑगस्ट रोजी आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनदेखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या (पान २ वर)

# स्व. गजानन तौर फाऊंडेशनच्या रक्तदान शिबिरात तब्बल ५०९ जणांचे रक्तदान

## स्मृतिदिनानिमित्त तीन दिवस विविध सामाजिक उपक्रम; सहा रक्तपेढ्यांकडून रक्तसंकलन

**जालना -प्रतिनिधी**

स्व. गजानन तौर यांच्या स्मृतिदिनानिमित्त स्व. गजानन तौर फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजसेवेचा वारसा जपत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल ५०९ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. त्यामुळे जिल्ह्यातील रक्तपेढ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, गरजू रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणात रक्तसाठा उपलब्ध झाला आहे. १७ जुलै रोजी आयोजित





अभिवादन कार्यक्रम व भव्य रक्तदान शिबिराला विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि शेकडो नागरिकांची उपस्थिती लाभली. यावेळी आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह फाऊंडेशनच्या अध्यक्षा कल्याणी तौर यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून स्व. गजानन तौर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली. यंदा रक्तदानासाठी युवकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याने रक्तसंकलनाची व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली होती. एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रक्तसंकलन करण्यासाठी सहा रक्तपेढ्यांच्या डॉक्टर व वैद्यकीय पथकांनी सहभाग घेतला. यामध्ये श्री स्वामी समर्थ रक्तसंकलन केंद्र, वरद रक्तसंकलन केंद्र (धुळे), जिल्हा सामान्य रुग्णालय जालना, बदनापूर रक्तपेढी, नूर हॉस्पिटल बदनापूर आणि राज्य रक्त संक्रमण केंद्र यांच्या माध्यमातून रक्तसंकलन करण्यात आले.

शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक रक्तदात्याचा झाड देऊन सन्मान करण्यात आला. युवक, महिला तसेच प्रथमच रक्तदान करणाऱ्या तरुणांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असल्याची भावना व्यक्त करत अनेकांनी नियमित रक्तदानाचा संकल्पही केला.

अभिवादन (पान २ वर)

# जालन्यात रविवारी राखी सावन मेला

## *अग्रवाल महिला मंडळ व जिल्हा अग्र नारी असोसिएशनचा संयुक्त सामाजिक उपक्रम*

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या अग्रवाल महिला मंडळ, जालना आणि अग्र नारी प्रांतीय असोसिएशन संचालित महाराष्ट्र राज्य अग्रवाल महिला संमेलन, जालना जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १९ जुलै रोजी राष्ट्रीय हिंदी विद्यालयात ''राखी सावन मेला द ग्रँड एक्स्पो आयोजित करण्यात आला आहे.

दरवर्षी सदर प्रकल्प राबविण्यात येत असून, त्यातून प्राप्त निधीतून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. श्रावण महिना, नागपंचमी आणि रक्षाबंधन या सणांच्या पार्श्वभूमीवर जालनेकरांसाठी एकाच छताखाली खरेदीची पर्वणी उपलब्ध करून देण्याचा या एक्स्पोचा उद्देश आहे. एक्स्पोचे उद्घाटन रविवारी सकाळी १० वाजता होणार असून, सायंकाळी ९ वाजेपर्यंत हा एक्स्पो सर्वांसाठी खुला राहणार आहे. या एक्स्पोत आकर्षक व विविध प्रकारच्या राख्या, डिझायनर साड्या, ड्रेसेस, कॉटन परिधान, चांदी ची व आर्टिफिशियल ज्वेलरी, पूजा साहित्य व ठाकुरजी पोशाख, इम्पोर्टेड पर्स, फुटवेअर, सौंदर्यप्रसाधने, होम डेकोर वस्तू, सणावारासाठी सजावटीचे साहित्य, मुखवास, हर्बल उत्पादने, प्रीमिक्स फूड, ज्यूस तसेच इतर अनेक आकर्षक वस्तूंचे स्टॉल्स असतील. याशिवाय, खवय्यांसाठी खास फूड कोर्ट उभारण्यात आले असून त्यामध्ये अनेक चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. या एक्स्पोमध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव, भुसावळ, खामगाव, अकोला, नागपूर, नाशिक, लासूर आदी ठिकाणांहून विक्रेते सहभागी होणार (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.